दाखल तारीख : २०/०७/२०१७
नोंदणी तारीख : २०/०७/२०१७
निर्णय तारीख : २३/०६/२०२२
कालावधी :०४वर्षे ११महिने ०३दिवस

**ठाणे येथील ७ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**

**(पिठासिन अधिकारी सौ.एस.व्ही. मेटील–पाटील)**

**CNR No.MHTH03-001692-2017**

**नियमीत फौजदारी खटला क्र.१८४/२०१७**
**निशाणी क्रमांक ३२**

महाराष्ट्र सरकार,
मार्फत राबोडी पोलीस स्टेशन ... **अभियोग पक्ष**

**विरुध्द**

१) अब्दुल हमीद यार मोहंमद शेख,
वय : ३९ वर्षे,

२) अब्दुल यार मोहंमद शेख,
वय : ३४ वर्षे,
आरोपी क्र.१ व २ राहणार मस्जिद गल्ली,
हरदासनगर, माजीवाडा, ठाणे पश्चिम.

३) अमिद अख्तर दळवी,
वय : ३१ वर्षे,
रहाणार सुन्नी सर्कल बिल्डींग/१०,
के.के.रोड, पहिली राबोडी, ठाणे पश्चिम.

४) शहजाद झियाउलहक कुरेशी,
वय : ४१ वर्षे,
राहणार आक्सा अपार्टमेंट/१०३,
डॉ.अन्सारी रोड, पहिली राबोडी,
ठाणे पश्चिम.

५) जुनैद युसूफ मोमीन,
वय : ४१ वर्षे, व्यवसाय : मॅकेनीक,

६) शाहीद राजी कुरेश,
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : मॅकेनीक,

७) जीमल इम्तीयाज खान,
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : चालक,
आरोपी क्र.५ ते ७ राहणार कुरेश चाळ/०२,
फ्रेंड्स सर्कल स्कुल जवळ, के.के.रोड,
पहिली राबोडी, ठाणे.

८) अब्दुल हकीम यार मोहमंद शेख,
वय : ३१ वर्षे, व्यवसाय : ट्रान्सपोर्ट
राहणार मस्जिद गल्ली, हरदासनगर,
माजीवाडा, हायवेरोड, ठाणे.

... **आरोपी**

**फिर्याद :—** भा.द.वि. कलम १४३, १४७, ३२३, ३२४ प्रमाणे अपराध केल्याचा गुन्हा.

**उपस्थिती:—** महाराष्ट्र शासनातर्फे सरकारी वकील:— श्री.ए.एच.नंदगिरी.
आरोपींचे वकील :— श्री. एन.एस.खान.

## न्यायनिर्णय

### (घोषीत दिनांक २३/०६/२०२२)

१) आरोपींना भारतीय दंड विधान संहिता, १८६०, (यापुढे भा. द.वि. असे संबोधण्यात येईल) कलम १४३, १४७, ३२३, ३२४ सह कलम १४९ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

### अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे.

२) फिर्यादी विवेक भगवानदीन गिरी आणि साक्षीदार विजयशंकर अनिल मिश्रा हे दोघेजण स्टेट बॅंक ऑफ इंडिया एटीएम, गोकुळनगर येथे पैसे भरण्यासाठी गेले असता तेथे त्यापुर्वीच आरोपी अब्दुल हकीम यार मोहमंद शेख हा एटीएम मध्ये पैसे भरणा करीत होता. त्याला पैसे भरण्यासाठी वेळ लागत असल्याने फिर्यादी व साक्षीदार यांनी एटीएममध्ये जाउन त्याला वेळ का लागत आहे असे विचारले असता, त्याचा आरोपीस राग येउन त्यांच्यामध्ये बाचाबाची झाली. त्यावेळी आरोपी क्र.१ अब्दुल हकीम यार मोहमंद शेख याने त्याचे इतर साथीदार आरोपी क्र.२ ते ८ यांना फोन करून बोलावून घेतले. तेव्हा आरोपी क्र.१ ते ८ यांनी आपसात संगणमत करून गैरकायद्याची मंडळी जमवून फिर्यादी विवेक गिरी, साक्षीदार विजयशंकर मिश्रा तसेच त्यांना सोडवण्यासाठी आलेले इतर साक्षीदार अजितकुमार सिंग, सुरज मिश्रा व सुभदार सिंग यांना ठोशाबुक्यांनी, लाथांनी मारहाण केली. तसेच आरोपी अब्दुल हकीम यारमोहमंद शेख याने पेव्हरब्लॉकने साक्षीदार अजितकुमार सिंग याचे डोक्यावर, पाठीवर मारहाण करून दुखापत केली म्हणून फिर्यादीने सदरची फिर्याद दाखल केलेली आहे. या फिर्यादी आधारे राबोडी पोलीसांनी गुन्हा नोंद क्र. I—२१२/२०१६ प्रमाणे भा.द.वि.कलम १४३, १४७, ३२३, ३२४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा नोंदवला.

३) सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरिक्षक अनिल विठ्ठल भवारी यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी फिर्याद नोंदवून साक्षीदाराचे जबाब नोंदविले व गुन्हयाचा तपास पूर्ण झालेनंतर आरोपींविरुध्द दोषारोपपत्र पाठविले.

४) माझे मा. सह पुर्वाधिकारी यांनी निशाणी २० वर

आरोपींविरुध्द भा.दं.वि.सं. कलम १४३, १४७, ३२३, ३२४ सह कलम १४९ प्रमाणे आरोपीविरूध्द दोषारोप ठेवला आहे. त्यातील मजकूर आरोपींना त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी तो नाकबूल केला व संपरिक्षा चालविण्याची तयारी दर्शवली. आरोपींविरूध्द सबळ पुरावा न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अंतर्गत जबाब नोंदवलेला नाही.

५) सरकार पक्षाची हकीकत विचारात घेता, न्यायनिर्णयाच्या निश्चितीकरीता माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष खालील कारणासहित नोंदविले आहे.

| **अ.क.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दि.१९.०८.२०१६ रोजी रात्री ११.१५ वाजता गोकुळनगर, एसबीआय बॅंकेच्या एटीएमचे बाहेर मोकळया जागेत, ठाणे येथे सर्व आरोपींनी समान उदिष्ट साध्य करण्यासाठी गैरकायद्याची मंडळी जमवून साक्षीदार अजितकुमार सिंग यास पेव्हेरब्लाकने डोक्यावर व पाठीवर मारहाण करून दुखापत केली आणि त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ३२४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला? | नकारार्थी |
| ०२ | वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी समान उदिष्ट साध्य करण्यासाठी गैरकायद्याची मंडळी जमवून फिर्यादीस हाताबुक्यांनी किरकोळ | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | दुखापत केली आणि त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ३२३ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला? | |
| ०३ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वरील नमुद तारखेस, वेळेस व ठिकाणी सर्व आरोपींनी फौजदारी बलप्रयोग करण्याच्या व मालमत्तेचे नुकसान करण्यासाठी गैरकायद्याची मंडळी जमवली व त्याचे सभासद झाले आणि त्यायोगे भा.द.वि. कलम १४३ सह १४९ अन्वये गुन्हा केला? | नकारार्थी |
| ०४ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वरील नमुद तारखेस, वेळेस व ठिकाणी आरोपींनी फौजदारी बलप्रयोग व मालमत्तेचे नुकसान करण्याच्या समान उदीष्टाने बेकायदेशीर जमाव जमवला व दंगा केला आणि त्यायोगे भा.द.वि. कलम १४७ सह १४९ अन्वये गुन्हा केला? | नकारार्थी |
| ०५ | काय आदेश? | आरोपींची निर्दोष मुक्तता केली. |

६) आरोपींवरील गुन्हा सिध्द करणेसाठी अभियोग पक्षाने फिर्यादी विवेक भगवान गिरी यांना तपासले आहे. फिर्यादीच्या पुराव्यानुसार सरकारपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. तर आरोपीतर्फे बचावासाठी कोणताही साक्षीदार तपासलेला नाही.

७) अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. नंदगिरी व

आरोपीतर्फे वकील श्री. एन.एस.खान यांचा युक्तीवाद ऐकला.

## कारणीमिमांस

## मुद्दा क्र. १ ते ४ साठी

८) सरकारपक्षाने आरोपींवरील गुन्हा शाबित करण्यासाठी घटनेदिवशी आरोपींनी संगनमत करून फिर्यादी व साक्षीदार यांना दुखापत करण्याचे समान उदीष्ट साधण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करून मारहाण केली तसेच आरोपी अब्दुल हकीम यारमोहमंद शेख याने पेव्हरब्लॉकने साक्षीदार अजितकुमार सिंग याचे डोक्यावर, पाठीवर मारहाण करून दुखापत केली हा मजकुर शाबीत करणे गरजेचे आहे.

९) हा मजकुर शाबीत करण्यासाठी सरकार पक्षाने साक्षीदार क्र. १ फिर्यादी विवेक गिरी यांना तपासले आहे. त्यांनी घटना चार वर्षापुर्वी गोल्डन पार्क, माजीवाडा येथे रात्री १२.०० ते १२.३० चे दरम्यान घडल्याचे सांगितले. फिर्यादीने घटनेदिवशी ते एटीएममध्ये पैसे जमा करण्यासाठी गेले होते. त्यावेळी बाहेर भांडण चालु होते. तेव्हा त्यांच्या पाठीमागुन कोणीतरी डोक्यावर मारले असे कथन त्यांनी केले आहे. घटनेबाबत त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली. मात्र दाखल असणा—या फिर्यादीतील मजकूर त्यांनी सांगितलेला नाही. सबब, याकामी फिर्यादीने दाखल केलेली फिर्याद शाबीत होउ शकलेली नाही. तसेच स्वत: फिर्यादीने आरोपींना ओळखले नाही व त्यांच्याविरूध्द गुन्हा शाबीत होईल अशी कोणतीही साक्ष दिलेली नाही.

१०) याखेरीज घटनेमध्ये विजयशंकर अनिल मिश्रा, अजितकुमार

चितबहादुर सिंग, सुरज कैलाश मिश्रा व सुभेदार कपीलदेव सिंग हे साक्षीदार जखमी असल्याचे दिसून येते. मात्र जखमी साक्षीदार अजितकुमार चितबहादुर सिंग, सुरज कैलाशनाथ मिश्रा, सुभेदार कपीलदेव सिंग व विजयशंकर अनिल मिश्रा यांनी घटनेबाबत कोणतीही बाब माहिती नसल्याचे सांगितल्याने सरकारी वकील यांनी साक्षीमधून त्यांना वगळले आहे. एकंदरीत फिर्यादी व जखमी साक्षीदार यांचा विचार करता, असे दिसून येते की, फिर्यादी, जखमी साक्षीदार व आरोपी यांचेमध्ये तडजोड झालेली आहे. तशी तडजोड पुरशीस निशाणी २९ वर दाखल आहे. मात्र, सदरहु गुन्हा तडजोडपात्र नाही. असे असले तरीही दाखल असणा—या पुराव्यावरूनही आरोपीविरूध्द कोणताही दोषारोप शाबीत होत नाही. सबब, घटनेदिवशी आरोपींनी संगनमत करून फिर्यादी व साक्षीदार यांना दुखापत करण्याचे समान उदीष्ट साधण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करून मारहाण केली तसेच आरोपी अब्दुल हकीम यारमोहमंद शेख याने पेव्हरब्लॉकने साक्षीदार अजितकुमार सिंग याचे डोक्यावर, पाठीवर मारहाण करून दुखापत केली हा मजकुर शाबीत झालेला नाही. म्हणुन मी मुद्दा क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

## मुद्दा क्र.५ साठी

११) मुद्दा क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी दिल्याने व आरोपींवरील गुन्हा शाबीत न झाल्याने या गुन्हयातून आरोपींची मुक्तता करणे योग्य व न्याय होईल म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१) अब्दुल हमीद यार मोहंमद शेख, आरोपी क्र.२) अब्दुल यार मोहंमद शेख, आरोपी क्र.१ व २ राहणार मस्जिद गल्ली, हरदासनगर, |

| | |
|---|---|
| | माजीवाडा, ठाणे पश्चिम आरोपी क्र.३) अमिद अख्तर दळवी, राहणार सुन्नी सर्कल बिल्डींग/१०, के.के.रोड, पहिली राबोडी, ठाणे पश्चिम, आरोपी क्र.४) शहजाद झियाउलहक कुरेशी, राहणार आक्सा अपार्टमेंट/१०३, डॉ.अन्सारी रोड, पहिली राबोडी, ठाणे पश्चिम, आरोपी क्र.५) जुनैद युसूफ मोमीन, आरोपी क्र.६) शाहीद राजी कुरेश, आरोपी क्र.७) जीमल इम्तीयाज खान, आरोपी क्र.५ ते ७ राहणार कुरेश चाळ/०२, फ्रेंड्स सर्कल स्कुल जवळ, के.के.रोड, पहिली राबोडी, ठाणे व आरोपी क्र.८) अब्दुल हकीम यार मोहमंद शेख, राहणार मस्जिद गल्ली, हरदासनगर, माजीवाडा, हायवेरोड, ठाणे, यांची भारतीय दंड विधान संहिता कलम १४३, १४७, ३२४, ३२३ सह कलम १४९ खालील शिक्षापात्र अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते. |
| ३. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) ची पुर्तता करणेकामी प्रत्येकी रक्कम रूपये १५,०००/— रुपयाचा वैयक्तीक जातमुचलका व जामीन कदबा द्यावा. |
| ४. | न्यायनिर्णय आरोपी, आरोपींचे वकील आणि सरकारी वकील यांचे समक्ष घोषीत. |

सही/—

ठिकाण :— ठाणे.
दिनांक :— २३/०६/२०२२

(श्रीमती. एस.व्ही. मेटील—पाटील)
७ वे सह. दिवाणी न्यायाधीश व
प्र. वर्ग न्यायदंडाधिकारी ठाणे